RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ५३] गुरुवार, जुलै ९, २०२६/आषाढ १८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ७९**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांजकडून

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/ सी आर /२९/ २०२१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस /११/२०१४ / सी आर / ७७ / अ२, दिनांक १९ जानेवारी २०१५ ( यास यापुढे "सदर अधिसूचना" असे संबोधले जाईल ) भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ३ पोट-कलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ ( झअ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल ;

त्याअर्थी, सदर अधिसूचना अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन आहे. त्याअर्थी, उप जिल्हाधिकारी ( भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांनी यापूर्वी अधिसूचना क्र. भूसंपादन/कात-२/कळंबुसरे/सी आर-२९/२०२१, दि. ०७/०७/२०२३ अन्वये कलम ११ ची अधिसूचना व अधिसूचना क्र. भूसंपादन/टे-८/कळंबुसरे/एसआर २९/२०२१/२०२६, दि. १४ मे २०२६ अन्वये कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध करण्यात आली आहे. उपरोक्त अधिसूचनेतील जमीन चिरनेर, आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी आवश्यक असलेबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल यांनी त्यांचेकडील पत्र क्र.सां.बा.वि. पनवेल/रेशा/कळंबुसरे बाह्यवळण/२५१७, दि.०१/०७/२०२६ अन्वये कळविण्यात आली आहे. त्यामुळे परिशिष्ट १ मध्ये नमूद जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी, सदर कायद्याचा कलम ११ उप- कलम (१) अन्वये अधिसूचित करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमीन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते ;

त्याअर्थी, परिशिष्ट - ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. आणि त्याअर्थी, परिशिष्ट- ४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे ;

आणि त्याअर्थी, परिशिष्ट - ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उप कलम( १ )अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे ; त्याअर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाहीः

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उप कलम (५) व भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे कलम १० उप नियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भुमि अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल ;

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उप कलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, रायगड हे समुचित शासन असल्याने उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १ उरण यांच्या वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट – १**

गावाचे नाव :- कळंबुसरे, ता. उरण, जि. रायगड

| अ.क्र. | स.नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | ३८/३ ई | ०-०३-४२ |
| २ | ३८/६ पै | ०-००-०९ |
| ३ | १३/६ पै | ०-००-४० |
| ४ | ३/३ पै | ०-००-८८ |
| ५ | ३/४ पै | ०-००-४९ |
| ६ | ३/५ पै | ०-००-०१ |
| ७ | ४ पै | ०-००-८२ |
| | **एकूण** | **०-०६-११** |

**परिशिष्ट – २**

**प्रकल्पाचे नाव** :- मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन.

**प्रकल्पाचे विवरण** :- मौजे कळंबुसरे, रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे** :- मौजे कळंबुसरे, ता. उरण येथील जमीन रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर-आवरे बाह्यवळण रस्त्यासाठी क्र.१/०० ते १/९०० मधील जमिनीचे संपादन केल्याने व रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर चिरनेर ते आवरे येथील लोकांना ये-जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

**परिशिष्ट – ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :- निरंक**

**परिशिष्ट – ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा :- महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग ४-अ, दि. १३ जून २०२३ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण २ आणि प्रकरण ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट दिली आहे.

## परिशिष्ट - ५
## प्रशासक नियुक्तीचे विवरण :- निरंक

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**नोट.—** प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. १, उरण यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

उरण,
दिनांक ९ जुलै २०२६.

**आविशकुमार सोनोने,**
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र. १, उरण.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.